**सहाय्यक लेखाधिकारी यांना महाराष्ट्र जिल्हा परिषद वित्त व लेखा सेवा वर्ग-३ ही परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सुट मंजूर करणे.**

**अहमदनगर जिल्हा परिषद**

**अर्थ विभाग**

**आदेश क्र.अर्थ/कार्या-१/आस्था-१/१८७/२०२४**

**अहमदनगर,दिनांक १५/०४/२०२४**

वाचाः- १) महाराष्ट्र जिल्हा परिषद,जिल्हा सेवा (सेवाभरती) नियम १९६७ मधील परि.११(१)

२) Departmantal Examination Rules,General Adinistration Department, Resolution No EXD-452/XVII,Dated 28th Nov 1979

३) Rural Devlopment Departmantal Resolution No.DSN1004/CR-253/13 ,Dated 25th Jun 1986

४) महाराष्ट्र शासन,ग्रामविकास विभाग,मंत्रालय मुंबई ,यांचेकडील पत्र क्र.डीएसबी-१०८७/सीआर-८०४/१३,दिनांक २५ मार्च १९८८

५)महाराष्ट्र शासन,ग्रामविकास विभाग,मंत्रालय मुंबई ,यांचेकडील पत्र क्र.एपीटी-१०८८/ /(सीआर-९२१),दिनांक २० नोंव्हेबर १९८९

६) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील पदोन्नती समिती मंजूर इतिवत्त दिनांक २७/०७/२०१२ व निर्गमित आदेश क्र.अर्थ/कार्या-१/आस्था-१/२०२/१२ दिनांक १३/०८/२०२२

७) सामान्य प्रशासन विभाग,मंत्रालय मुंबई यांचेकडील परिपत्रक क्र.परीक्षा-२०१२/प्र.क्र.३/१७, दिनांक १३ संप्टेबर २०१२

८)महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्र.संकीर्ण-२३१८/प्र.क्र.३/१७ दि. ०१/०३/२०१८

९) महाराष्ट्र शासन,सा.प्र. विभाग,शासन शुध्दीपत्रक क्र.संकीर्ण-२३१८/प्र.क्र.३/१७ दि. ११/८/२०२२

१०) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद अहमदनगर यांचेकडील अधिकार प्रदान आदेश क्र.साप्रवि-१/र.व का./६९६/२०१६, दिनांक १७ जून २०१६ (५७)

११) श्री.एस.एन.आगलावे,सहाय्यक लेखाधिकारी यांचा विनंती अर्ज दिनांक ०३/०४/२०२४

शासनाचे उपरोक्त संदर्भीय शासन निर्णय व परिपत्रकान्वये जिल्हा परिषदेच्या कर्मचा-यांना महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ चे नियम ५ परिशिष्ट ११ मधील अ.क्र.१ नुसार वरीष्ठ पदावर पदोन्नती देणेकरीता **कनिष्ठ लेखाधिकारी** यांना महाराष्ट्र जिल्हा परिषद वित्त व लेखा सेवा वर्ग-३ ही परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.तसेच सदर परीक्षा उत्तीर्ण होणेचे अटीवर सहाय्यक लेखाधिकारी या पदावर पदोन्नती देणेची तरतूदही आहे.

तथापि शासन निर्णय संदर्भ क्रमांक ८ व त्याअनुषंगाने निर्गमित शासन निर्णय संदर्भ क्रमांक ९ मधील शुध्दीपत्रकातील तरतूदीनुसार ज्या कर्मचा-यांना वयाची ५० वर्ष पुर्ण झालेली आहेत व शासन सेवेत १५ वर्षे पुर्ण झालेली आहेत त्यांना महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ चे नियमातील तरतुदीनुसार असलेल्या महाराष्ट्र जिल्हा परिषद वित्त व लेखा सेवा वर्ग-३ या परीक्षेतून उत्तीर्ण होणेपासून सुट देणेत यावी असे आदेश आहेत.

त्याअर्थी मी मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर मला संदर्भ क्र.१० अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील सहाय्यक लेखाधिकारी यांच्या नावासमोर दर्शविणेत आल्यानुसार ज्यांना वयाची ५० वर्ष पुर्ण झालेली आहेत. व शासन सेवते १५ वर्षे पुर्ण झालेली आहेत त्या **सहाय्यक लेखाधिकारी** यांना **महाराष्ट्र जिल्हा परिषद वित्त व लेखा सेवा वर्ग-३ ही परीक्षा** उतीर्ण होणेपासून उपरोक्त शासन निर्णय/ परीपत्रकानुसार **सूट मंजूर करणेत येत आहे.**

| अ.क्र. | कर्मचा-याचे नाव | पदनाम | जन्मतारीख | सहाय्यक लेखाधिकारी संवर्गात हजर दिनांक | ५० वर्ष पुर्ण झाल्याचा दिनांक | ५० वर्ष पुर्ण केलेमूळे म.जि.प.वि.व ले.सेवा वर्ग-३ या परीक्षेतून सूट दिल्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | श्री. आगलावे एस.एन | स.ले.अ. | ०२.०४.१९७४ | २१.०८.२०१२ | ०१.०४.२०२४ | ०२.०४.२०२४ |

उपरोक्त सहाय्यक लेखाधिकारी यांना संदर्भ क्रमांक ६ मधील मंजूर इतिवृत्तानुसार महाराष्ट्र जिल्हा परिषद,जिल्हा सेवा (सेवाभरती) नियम १९६७ मधील नियम ५ परि.११(१) मधील तरतूदीनुसार महाराष्ट्र जिल्हा परिषद वित्त व लेखा सेवा वर्ग-३ हि परीक्षा पदोन्नती दिलेचे तारखेपासून दोन वर्षाचे आंत उत्तीर्ण होणेचे अटीस अधिन राहुन सहाय्यक लेखाधिकारी या पदावर पदोन्नत केलेले आहे.तथापी श्री.आगलावे हे उक्त कालावधीत सदर परीक्षा उत्तीर्ण न झालेमुळे त्यांनी त्यांची सहाय्यक लेखाधिकारी या पदाची सेवाज्येष्ठता गमावलेली असून त्यांची सेवाज्येष्ठता हि वरिल रकाना क्रमांक ७ मधील सुटीचे दिनांकापासून निश्चित करण्यात येत आहे.त्याप्रमाणे त्यांचे मुळ सेवापुस्तकामध्ये सदर आदेशाची नोंद घेण्यात यावी.

सदरचा आदेश जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२४०४१५०५००१८ असा आहे.

(शैलेश मोरे)
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
**जिल्हा परिषद अहमदनगर**

प्रति,

१. श्री.एस.एन.आगलावे,सहाय्यक लेखाधिकारी,अर्थ विभाग,जि.प.अहमदनगर

प्रतः- आस्थापना-२ कार्यासन

२/-उपरोक्त सहाय्यक लेखाधिकारी यांना वयाची ५० वर्ष पूर्ण झाल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद वित्त व लेखा सेवा वर्ग-३ ही परीक्षा उत्तीर्ण होणेपासून सुट देणेत आलेली आहे. त्या प्रमाणे संबधितांचे मूळ सेवा पुस्तकामध्ये **सदर ओदशाची नोंद ध्यावी** आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल उलट टपाली सादर करावा.

(शैलेश मोरे)
**मुख्य लेखा व वित्त अधिकारी**
**जिल्हा परिषद अहमदनगर**